# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ३१ जानेवारी, २०१२.

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यतील नगरपालिकांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. एसईसी/आरपीपी/२००९/ सी.आर.४९/का.११, दि.३१ मार्च,२००९ च्या महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ च्या परिच्छेद ९ मध्ये महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उमेदवाराने राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत असल्याबाबतची जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे लेखी सूचना व सूचना पत्र संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिती जिल्हाधिकारी यांना देणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. एसईसी/ आरपीपी / २००९ / सी.आर.४९ / का.११,दि.३१ मार्च,२००९ च्या महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ च्या परिच्छेद ९ मध्ये महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उमेदवाराने राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत असल्याबाबत आदेश क्र.-एसईसी/ आरपीपी / २००९ / सी.आर.४९/का.११, दि.२४ जानेवारी, २०१२ अन्वये सुधारणा केली असून त्यानुसार जोडपत्र-१ व

जोडपत्र-२ मध्ये नव्याने विहित केले असून त्यानुसार सदर सूचना नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या दिनांकास दुपारी ३.०० पर्यंत देता येईल अशी तरतुद केली आहे.

आणि ज्याअर्थी, त्यानुसार 'वैधरित्या नामनिर्देशन उमेदवाराची यादी' प्रसिध्द करतांना उमेदवार कोणत्या पक्षाचा अथवा अपक्ष आहे हे निश्चित होणार नसून याची निश्चिती चिन्ह वाटपा नंतर निवडणूक लढवणा-या उमेदवाराची यादी जाहीर करताना होईल.

आणि ज्याअर्थी त्यामुळे वैधरित्या नामनिर्देशित उमेदवाराच्या यादीमध्ये कोणत्या पक्षाचा उमेदवार म्हणून नमूद करावे यासंबंधाने अधिक स्पष्टीकरणात्मक आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, उपरोक्त परिस्थितीत उमेदवारांनी वेगवेगळया अर्जात नमूद केलेल्या सर्व पक्षांची नावे 'वैधरित्या नामनिर्देशन उमेवाराच्या यादीत' स्वल्पविराम देऊन नमूद करावीत. सदर उमेदवार कोणत्या पक्षाचा अधिकृत उमेदवार आहे हे चिन्ह वाटपानंतर लावण्यात येणा-या 'निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादी' मध्ये जाहीर होईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

( ध.मा.कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगरपरिषदा/ नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी.